॥ श्री नवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 2 --- DVITEEYODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

Chapter 2 After twelve years of intense penance at Badrinath, Lord Shiva and Dattatreya appear before Machchindranath, granting him ultimate spiritual mastery. He then travels to Saptashrungi hill, where he creates the powerful Sabari Vidya (mantra system) with the Goddess's direct blessing. The assembly of gods grants him divine boons to ensure his mission succeed. Continuing his journey, Machchindra visits Avantika (Ujjain), where he initiates King Bhartari into the Nath path, setting a timeline for the King's future renunciation. Later, in Bengal, he stays with a childless Brahmin couple, Sarvopadyal and Saraswati. Moved by their deep devotion, Machchindra gives Saraswati a pinch of sacred ash, promising her a divine son However, filled with fear by skeptical neighbors, Saraswati secretly throws the holy ash into a cow-dung pit instead of consuming it. Unaware of her actions, Machchindranath leaves with a promise to return in twelve years to claim his disciple.

Ovee 1

जयजयाजी मूळपीठवासिनी । पुंडलिकाच्या गोंधळालागोनी । भक्तवरदे भवानी । उभी असती माये तूं ॥ १ ॥

Transliteration

Jaya-jaya-ji moola-peetha-vaasinee | Pundalikaachyaa gondhalaa-laagonee | Bhakta-varade Bhavaanee | Ubhee asasee maaye too ||

Ovee 2

संत गोंधळीं विचश्रण । कंठीं मिरवितां तुळसीभूषण । तेचि माळा सुलक्षण । जगामाजी मिरविसी ॥ २ ॥

Transliteration

Santa gondhalee vichashranu | Kanthee miravitaa tulasee-bhooshanu | Techi maalaa sulakshanu | Jagaa-maajee miravisee ||

Ovee 3

घालिती तुझा प्रेमगोंधळ । कामक्रोधांचे देती बळ । गीतसंगीत सबळ । गुण गाती माये तुझे ॥ ३ ॥

Transliteration

Ghaalitee tujhaa prema-gondhalu | Kaama-krodhaanche detee balu | Geeta-sangeeta sabalu | Guna gaatee maaye tujhe ||

Ovee 4

असो ऐशा गोंधळप्रकरणीं । संतुष्ट होसी माय भवानी । तरी या ग्रंथगोंधळीं येऊनी । साह्य करी जननीये ॥ ४ ॥

Transliteration

Aso aishaa gondhala-prakaranee | Santushta hosee Maaya Bhavaanee | Taree yaa grantha-gondhalee yeuunee | Saahya karee jananeeye ||

Ovee 5

मागिल्या अध्यायीं रसाळ कथन । गणादि सकळांचे केलें नमन । उपरी मच्छिंद्राचें जनन । यथाविधी कथियेलें ॥ ५ ॥

Transliteration

Maagilyaa adhyaayee rasaala kathanu | Ganaadi sakalaanche kele namanu | Uparee Machchindraache jananu | Yathaavidhee kathiyele ||

Ovee 6

आतां पुढे श्रवणार्थी । बैसले आहेत महाश्रोती । तयांची कामना भगवती । पूर्ण करावया येई कां ॥ ६ ॥

Transliteration

Aataa pudhe shravana arthee | Baisale aaheta mahaa-shrotee | Tayaanchee kaamanaa Bhagavatee | Poorna karaavayaa yeee kaa ||

Ovee 7

तरी श्रोतीं सिंहावलोकनीं कथन । श्रीदत्तदेव आणि उमारमण । भागीरथीविपिनाकारण । पहात पहात चालिले ॥ ७ ॥

Transliteration

Taree shrotee sinha-avalokanee kathanu | Shree Datta Deva aani Umaaramanu | Bhaageerathee-vipinaa-kaaranu | Pahaata pahaata chaalile ||

Ovee 8

जैसे फलानिमित्त पक्षी । फिरत राहती वृक्षोवृक्षी । त्याचि न्याये उभयपक्षी । गमन करिती तीरातें ॥ ८ ॥

Transliteration

Jaise phala-animitta pakshee | Phirata raahatee vriksho-vrikshee | Tyaachi nyaaye ubhaya-pakshee | Gamana karitee teeraate ||

Ovee 9

सहज चालती विपिनवाटी । तो मच्छिंद्र देखिला त्यांनीं दृष्टीं । बाळतनू पाठपोटीं । अस्थि त्वचा उरल्या पैं ॥ ९ ॥

Transliteration

Sahaja chaalatee vipina-vaatee | Toh Machchindra dekhilaa tyaannee drishtee | Baala tanoo paatha potee | Asthi tvachaa uralyaa pai ||

Ovee 10

जटा पिंगट नखें जळमट । कंटकारी पादांगुष्ठ । कार्पासमय झाली दृष्ट । त्वचा लिपटली अस्थींसी ॥ १० ॥

Transliteration

Jataa pingata nakhe jalamatu | Kantakaaree paada-angushthu | Kaarpaasamaya jhaalee drishtu | Tvachaa lipatalee astheensee ||

Ovee 11

सर्वांगें शिरा टळटळाट । दिसती अवनीं नामपाठ । ध्वनिमात्र शब्द उठे । चलनवलन नयनांचें ॥ ११ ॥

Transliteration

Sarvaange shiraa talatalaatu | Disatee avanee naama paathu | Dhvanimaatra shabda uthe | Chalana-valana nayanaanche ||

Ovee 12

ऐसा पाहूनि तपोजेठी । विस्मयो करिती आपुले पोटीं । म्हणती ऐसा कलीपाठीं । तपी नेणों कोणीच ॥ १२ ॥

Transliteration

Aisaa paahuuni tapojethee | Vismayo karitee aapule potee | Mhanatee aisaa Kalee-paathee | Tapee neno koneecha ||

Ovee 13

अहो विश्वामित्रप्रकरणी । दिसतो तपी हा मुगुटमणी । तपार्थ कामना अंतःकरणीं । करणी कोण यातें उदेली ॥ १३ ॥

Transliteration

Aho Vishvaamitra-prakaranee | Disato tapee haa mugutamanee | Tapaartha kaamanaa antakaranee | Karanee kona yaate udelee ||

Ovee 14

मग दत्तासि म्हणे आदिनाथ । मी स्थिरता राहतों महीं येथ । तुम्हीं जाऊनि कामनेतें । विचारावें तयातें ॥ १४ ॥

Transliteration

Maga Dattaasi mhane Aadinaathu | Mee sthirataa raahato mahee yethu | Tumhee jaauuni kaamanete | Vichaaraave tayaate ||

Ovee 15

कवणा अर्थी कैसा भाव । उचंबळला कामार्णव । तरी लिप्सेचा समूळ ठाव । काय तोही पहावा ॥ १५ ॥

Transliteration

Kavanaa arthee kaisaa bhaavu | Uchambalalaa kaamaarnavu | Taree lipsechaa samoola thaavu | Kaaya tohee pahaavaa ||

Ovee 16

येऊनि त्यापरी अत्रिनंदन । शिवानंदसूक्तिक सुढाळ रत्न । श्रवणपुटीं स्वीकारुन । तयापासीं पातला ॥ १६ ॥

Transliteration

Yeuuni tyaaparee Atrinandanu | Shiva-aananda-sooktikaa sudhaala ratnu | Shravana-putee sveekaarunu | Tayaapaasee paatalaa ||

Ovee 17

उभा राहोनि समोर दृष्टी । म्हणे महाराजा तपोजेठी । कवण कामना उदेली पोटीं । तें वरदवरातें मिरवावें ॥ १७ ॥

Transliteration

Ubhaa raahoni samora drishtee | Mhane Mahaaraajaa tapojethee | Kavana kaamanaa udelee potee | Tey varada-varaate miravaave ||

Ovee 18

ऐसें वरदाचे वागवट । मच्छिंद्र श्रवण करितां झगट । नम्रभाव धरुनि प्रकट । तयालागीं बोलत ॥ १८ ॥

Transliteration

Aise varadaache vaagavatu | Machchindra shravana karitaa jhagatu | Namrabhaava dharuni prakatu | Tayaa laagee bolata ||

Ovee 19

कर्णी शब्द पडतां सुखस्थिती । दृष्टी काढोनियां वरती । पाहता झाला दत्ताप्रती । महाराज योगी तो ॥ १९ ॥

Transliteration

Karnee shabda padataa sukha sthitee | Drishtee kaadhoniyaa varatee | Paahataa jhaalaa Dattaa pratee | Mahaaraaja yogee toh ||

Ovee 20

भ्रूसंकेतें करोनि नमन । दाविता झाला निजनम्रपण । जो कीं ईश्वरी आराधन । प्राप्तीलागी ऊदेला ॥ २० ॥

Transliteration

Bhroo-sankete karoni namanu | Daavitaa jhaalaa nija-namrapanu | Jo kee Eeshvaree aaraadhanu | Praaptee-laagee udelaa ||

Ovee 21

बोले महाराजा कृपासरिता । तुम्ही कोण तें सांगावें आतां । द्वादश वर्षे काननीं लोटतां । मानव नातळे दृष्टीसी ॥ २१ ॥

Transliteration

Bole Mahaaraajaa kripaa saritaa | Tumhee kona tey saangaave aataa | Dvaadasha varshe kaananee lotataa | Maanava naatale drishteesee ||

Ovee 22

तरी त्वच्चित्त सदैव भवानी । प्रत्यक्ष झाली मम प्रारब्धें धरणीं । तरी प्रसादनग अभ्युत्थानीं । स्थापूनि जाईं महाराजा ॥ २२ ॥

Transliteration

Taree tvachchitta sadaiva Bhavaanee | Pratyaksha jhaalee mama praarabdhe dharanee | Taree prasaada-naga abhyutthaanee | Sthaapuuni jaaee Mahaaraajaa ||

Ovee 23

ऐसें तयाचें वागुत्तर । ऐकोनि तोषला अनसूयाकुमर । म्हणे वा रे नामोच्चार । दत्त ऐसें मज म्हणती ॥ २३ ॥

Transliteration

Aise tayaache vaaguttaru | Aikoni toshalaa Anasooyaa-kumaru | Mhane vaa re naama-ucchaaru | Datta aise maja mhanatee ||

Ovee 24

जो व्याघ्रपदीं ऋषिजन्म । अत्रि ऐसें तया नाम । तयाचा सुत मी दासोत्तम । महीलागीं आधारलों ॥ २४ ॥

Transliteration

Jo Vyaaghra-padee rishi janmu | Atri aise tayaa naamu | Tayaachaa suta mee daasottamu | Mahee-laagee aadhaaralo ||

Ovee 25

तरी असो ऐसी गोष्टी । कवण कामना तुझ्या पोटीं । उदेली जे तपोजेठी । शब्दसंपुटीं मिरवीं कां ॥ २५ ॥

Transliteration

Taree aso aisee goshtee | Kavana kaamanaa tujhyaa potee | Udelee je tapojethee | Shabda-samputee miravee kaa ||

Ovee 26

येरु म्हणे वरदोस्तु । कामना वरी एक भगवंतु । ऐसें वदता झाला अतीतु । पदावरी लोटला ॥ २६ ॥

Transliteration

Yeru mhane varadostu | Kaamanaa varee eka Bhagavantu | Aise vadataa jhaalaa ateetu | Padaavaree lotalaa ||

Ovee 27

जैसी सासुऱ्या बाळा असतां । अवचट दृष्टी पडे माता । हंबरडोनि धांवोनि येतां । ग्रीवे मिठी घालीतसे ॥ २७ ॥

Transliteration

Jaisee saasuryaa baalaa asataa | Avachata drishtee pade maataa | Hambaradoni dhaavoni yetaa | Greeve mithee ghaaleetase ||

Ovee 28

किंवा अवचट वत्सा भेटतां गाय । मग प्रेम लोटी चित्त सदैव । तेणेंपरी मच्छिंद्र मोहें । पदावरी लोटला तो ॥ २८ ॥

Transliteration

Kivaa avachata vatsaa bhetataa gaayu | Maga prema lotee chitta sadaivu | Tenemparee Machchindra mohe | Padaavaree lotalaa toh ||

Ovee 29

द्वादश वर्षे तपाचे श्रम । ते आजि फळले मानूनि उत्तम । सांडोनि सकळ आपुला नेम । पदावरी लोटला तो ॥ २९ ॥

Transliteration

Dvaadasha varshe tapaache shramu | Tey aaji phalale maanuuni uttamu | Saandoni sakala aapulaa nemu | Padaavaree lotalaa toh ||

Ovee 30

परी तपश्रमाचे बहुत क्लेश । हृदयीं गहिंवरले दु:खलेश । नेत्रींचे झरे विशेष । पदावरी लोटला तो ॥ ३० ॥

Transliteration

Paree tapa-shramaache bahuta kleshu | Hridayee gahivarale dukhaleshu | Netreenche jhare visheshu | Padaavaree lotalaa toh (tai) ||

Ovee 31

तेणें झालें पादक्षालन । पुढती बोले करी रुदन । हे महाराजा तूं भगवान । महीमाजी मिरविशी ॥ ३१ ॥

Transliteration

Tene jhaale paada-kshaalanu | Pudhatee bole karee rudanu | Hey Mahaaraajaa too Bhagavaanu | Mahee maajee miravishee ||

Ovee 32

रुद्र विष्णु विरिंची सदय । त्रिवर्गरुपी देह ऐक्यमय । ऐसें असोनि सर्वमय । साक्षी महीं अससी तूं ॥ ३२ ॥

Transliteration

Rudra Vishnu Virinchee sadayu | Trivarga rupee deha aikyamayu | Aise asoni sarvamayu | Saakshee mahee asasee toh ||

Ovee 33

तरी येऊनि सर्वज्ञमूर्ती । असोनि माझा विसर चित्तीं । पडलासे किमर्थ अर्थी । अपराध गळीं सेवोनियां ॥ ३३ ॥

Transliteration

Taree yeuuni Sarvajnya Moortee | Asoni maajhaa visara chittee | Padalaase kimartha arthee | Aparaadha galee sevoniyaa ||

Ovee 34

ऐसें म्हणोनि वारंवार । ग्लानींत करी नमस्कार । क्लेशनगींचे चक्षुद्वार । सरितालोट लोटवी ॥ ३४ ॥

Transliteration

Aise mhanoni vaaranvaaru | Glaaneenta karee namaskaaru | Klesha-nageenche chakshu-dvaaru | Saritaa lota lotavee ||

Ovee 35

तरी तो अत्यंत शांत दाता । म्हणे बा हे न करी चिंता । प्रारब्धमंदराचळाची सरिता । ओघ ओघील आतांचि ॥ ३५ ॥

Transliteration

Taree toh atyanta shaanta daataa | Mhane baa hey na karee chintaa | Praarabdha-Mandaraachala-achee saritaa | Ogha ogheela aataanchi ||

Ovee 36

मगवरदहस्ते स्पर्शोनि मौळी । कर्णी ओपीत मंत्रावळी । तेणें अज्ञानदशाकाजळी । फिटोनि गेली तत्काळ ॥ ३६ ॥

Transliteration

Maga varada haste sparshoni maulee | Karnee opeeta mantra-aavalee | Tene ajnyaana-dashaa-kaajalee | Phitoni gelee tatkaala ||

Ovee 37

जैसे माहात्म्य भारती । उदयदृष्टी करितां गभस्ती । मग अंधकाराची व्याप्ती । फिटोनि जाय तत्काळ ॥ ३७ ॥

Transliteration

Jaise maahaatmya Bhaaratee | Udaya drishtee karitaa gabhastee | Maga andhakaaraachee vyaaptee | Phitoni jaaya tatkaala ||

Ovee 38

तेवी दत्त वरदघन । वोळतां गेले सकळ अज्ञान । मग चराचर सकळ जीवन । जैसे हेलावले दृष्टीसी ॥ ३८ ॥

Transliteration

Tevee Datta varada ghanu | Volataa gele sakala ajnyaanu | Maga charaachara sakala jeevanu | Jaise helaavale drishteesee ||

Ovee 39

नाठवे कांहीं दुजेपण । झालें ऐक्य ब्रह्मसनातन । जैसे उदधीं सरिता जीवन । जीवना जीवनसम दिसे ॥ ३९ ॥

Transliteration

Naathave kaanhee dujepanu | Jhaale aikya Brahma-sanaatanu | Jaise udadhee saritaa jeevanu | Jeevanaa jeevana sama dise ||

Ovee 40

ऐसी झालिया जीवनसम दृष्टी । आत्रेय धरिता झाला पोटीं । म्हणे बा रे योगी धूर्जटी । इंदिरावर कोठे तो सांग ॥ ४० ॥

Transliteration

Aisee jhaaliyaa jeevana sama drishtee | Aatreya dharitaa jhaalaa potee | Mhane baa re yogee Dhoorjatee | Indiraavara kothe toh saanga ||

Ovee 41

येरु म्हणे जी ताता । ईश्वरावांचोनि नसे वार्ता । जळीं स्थळीं काष्ठीं महीं पर्वता । ईश्वर नांदे सर्वस्वीं ॥ ४१ ॥

Transliteration

Yeru mhane jee taataa | Eeshvaraa-vaanchoni nase vaartaa | Jalee sthalee kaashthee mahee parvataa | Eeshvara naande sarvasvee ||

Ovee 42

ऐसे ऐकोनि वागुत्तर । ग्रीवा तुकवी अत्रिकुमर । मग सच्छिष्याचा धरोनि कर । चालता झाला महाराज तो ॥ ४२ ॥

Transliteration

Aise aikoni vaaguttaru | Greevaa tukavee Atrikumaru | Maga sat-shishyaachaa dharoni karu | Chaalataa jhaalaa Mahaaraaja toh ||

Ovee 43

सहज चालतां चाले नेटीं । आले आदिनाथ प्रेमदृष्टीं । मच्छिंद्र मूर्धकमळघाटी । पदावरी वाहातसे ॥ ४३ ॥

Transliteration

Sahaja chaalataa chaale netee | Aale Aadinaatha prema drishtee | Machchindra moordha-kamala-ghaatee | Padaavaree vaahaatase ||

Ovee 44

शिवें पाहूनि मंददेहीं । म्हणे हा पूर्वी नारायण कवी । मग प्रेमसरितेच्या लोटप्रवाहीं । धरिला हृदयीं तत्काळ ॥ ४४ ॥

Transliteration

Shive paahuuni mandadehee | Mhane haa poorvee Naaraayana Kavee | Maga prema sarite chyaa lota pravaahee | Dharilaa hridayee tatkaala ||

Ovee 45

मग त्रिवर्ग येऊनि त्या स्थानीं । दत्तासी म्हणे पंचमूर्धनी । या शिष्यांते अभ्यासोनि । सकळ सिद्धी मिरवीं कां ॥ ४५ ॥

Transliteration

Maga trivarga yeuuni tyaa sthaanee | Dattaasee mhane pancha moordhanee | Yaa shishyaante abhyaasoni | Sakala siddhee miravee kaa ||

Ovee 46

जें वेदकारणाचें निजसार । जें सर्वोपकाराचें गुहागर । सकळ सिद्धींचे अर्थमाहेर । निवेदीं तूं महाराजा ॥ ४६ ॥

Transliteration

Je Veda-kaaranaache nijasaaru | Je sarva-upakaaraache guhaagaru | Sakala siddheenche artha-maaheru | Nivedee too Mahaaraajaa ||

Ovee 47

जारणमारण उच्चाटन । शापादपि निवारण । शरादपि अस्त्रादिनिबर्हण । ममत्रशक्ती त्या वरत्या ॥ ४७ ॥

Transliteration

Jaarana-maarana uchchaatanu | Shaapaadapi nivaaranu | Sharaadapi astra-aadi-nibarhanu | Mantra-shaktee tyaa varatyaa ||

Ovee 48

जो जैसा कर्मविजे पाठ । होती दैवतें वरती भेट । वंशवरद वाक्पट । मस्तकीं स्थापोनि जाताती ॥ ४८ ॥

Transliteration

Jo jaisaa karmavije paathu | Hotee daivate varatee bhetu | Vamsha varada vaakpatu | Mastakee sthaaponi jaataatee ||

Ovee 49

वरुण आदित्य सोमस्वामी । भौमशक्रादि यमदमी । शिवशक्ति कामतरणी । वर देऊनि उठविले ॥ ४९ ॥

Transliteration

Varuna Aaditya Somasvaamee | Bhauma-Shakraaadi Yamadamee | Shiva Shakti Kaama taranee | Vara deuuni uthavile ||

Ovee 50

विष्णु विरिंची कृपाकृती । वरदबीजे देऊनि शक्ति । ते मंत्रअस्त्रे अपारगती । हृदयामाजी हेलावला ॥ ५० ॥

Transliteration

Vishnu Virinchee kripaa kritee | Varada beeje deuuni shakti | Tey mantra astre apaaragatee | Hridayaa-maajee helaavalaa ||

Ovee 51

असो सद्विद्येचा मंदराचळ । उभवोनियां अत्रिबाळ । क्षणमात्र वेंचूनि केला सबळ । सिद्धतरणी जेउता ॥ ५१ ॥

Transliteration

Aso sat-vidyechaa Mandaraa-chalu | Ubhavoniyaa Atribaalu | Kshanamaatra venchuuni kelaa sabalu | Siddha taranee jeutaa ||

Ovee 52

नागबकादि वातास्त्र । नगनागादि महावज्र । पावक जलधी अस्त्र पवित्र । सांगोपांग तो झाला ॥ ५२ ॥

Transliteration

Naaga-baka-aadi vaataastru | Naga-naaga-aadi mahaa vajru | Paavaka jaladhee astra pavitru | Saanga-upaanga toh jhaalaa ||

Ovee 53

ऐसें सांगोनि सांगोपांग । जाता झाला योगमार्ग । परी संप्रदाय योजूनि योग । कानफाडी मिरवला ॥ ५३ ॥

Transliteration

Aise saangoni saanga-upaangu | Jaataa jhaalaa yoga maargu | Paree sampradaaya yojuuni yogu | Kaanaphaadee miravalaa ||

Ovee 54

पुढील भविष्य जाणोन । सांप्रदाय केला निर्माण । षड्रुप जोगीदर्शन । कानफाडी मिरवले ॥ ५४ ॥

Transliteration

Pudheela bhavishya jaanonu | Saampradaaya kelaa nirmaanu | Shadrupa jogee darshanu | Kaanaphaadee miravale ||

Ovee 55

नाथ ऐसे देऊनि नाम । शिंगी शैली देऊनि भूषण । ऐसें परिकरोनि प्रमाण । अत्रिनंदन पैं गेला ॥ ५५ ॥

Transliteration

Naatha aise deuuni naamu | Shingee shailee deuuni bhooshanu | Aise parikaroni pramaanu | Atrinandana pai gelaa ||

Ovee 56

यापरी तो मच्छिंद्रनाथ । नमोनि निघाला आदिनाथ । महीवरी नाना तीर्थे । शोध करीत चालिला ॥ ५६ ॥

Transliteration

Yaaparee toh Machchindra-Naathu | Namoni nighaalaa Aadinaathu | Maheevaree naanaa teerthe | Shodha kareeta chaalilaa ||

Ovee 57

तो भ्रमण करितां सप्तश्रृंगीं । येता झाला महायोगी । अंबिका वंदोनि मनोमार्गी । सप्रेम स्थितीं गौरविली ॥ ५७ ॥

Transliteration

Toh bhramana karitaa Sapta-Shrringee | Yetaa jhaalaa mahaa yogee | Ambikaa vandoni manomaargee | Saprema sthitee gauravilee ||

Ovee 58

करीत वैखरीं अंबास्तवन । तों आलें कल्पनें मन । कीं कांहीं तरी कवित्वसाधन । लोकांमाजी मिरवावें ॥ ५८ ॥

Transliteration

Kareeta vaikharee Ambaa stavanu | Toh aale kalpane manu | Kee kaanhee taree kavitva saadhanu | Lokaam-maajee miravaave ||

Ovee 59

कवित्व तरी करावें ऐसें । कीं उपयोगीं पडे सर्व जगास । मग योजोनियां शाबरीविद्येस । मनामाजी ठसविली ॥ ५९ ॥

Transliteration

Kavitva taree karaave aise | Kee upayogee pade sarva jagaasu | Maga yojoniyaa Shaabaree-vidyesu | Manaamaajee thasavilee ||

Ovee 60

यापरी अनेक कल्पना करीत । कीं शाबरीविद्येचें करावें कवित । परी वरदगुंतीं वश्य दैवत । केउते रीतीं होतील ॥ ६० ॥

Transliteration

Yaaparee aneka kalpanaa kareetu | Kee Shaabaree-vidyeche karaave kavitu | Paree varada-guntee vashya daivatu | Keute reetee hoteela ||

Ovee 61

मग अंबेपासी अनुष्ठान । करिता झाला सप्तदिन । वेदबीजाचें अभिषिंचन । अंबेलागी करीतसे ॥ ६१ ॥

Transliteration

Maga Ambepaasee anushthaanu | Karitaa jhaalaa saptadinu | Veda-beejaache abhishinchanu | Ambelaagee kareetase ||

Ovee 62

तेणें जागृत महिषमर्दिनी । होऊनि बोले तयालागोनी । बा रे कवण कामना मनीं । वेधली तें मज सांग ॥ ६२ ॥

Transliteration

Tene jaagrita Mahisha-Mardinee | Houuni bole tayaa-laagonee | Baa re kavana kaamanaa manee | Vedhalee tey maja saanga ||

Ovee 63

येरु म्हणे वो जगज्जननी । शाबरी विद्येचें कवित्व कामनीं । वेधक परी वरालागोनी । उपाय कांही मज सांग ॥ ६३ ॥

Transliteration

Yeru mhane vo Jagat-Jananee | Shaabaree-vidyeche kavitva kaamanee | Vedhaka paree varaa-laagonee | Upaaya kaanhee maja saangu ||

Ovee 64

उपरी बोले चंडिका भवानी । पूर्णता पावशी सकळ कामनीं । मग त्या सिद्धाचा हात धरोनी । मार्तंडपर्वतीं पैं नेला ॥ ६४ ॥

Transliteration

Uparee bole Chandikaa Bhavaanee | Poornataa paavashee sakala kaamanee | Maga tyaa siddha achaa haata dharonee | Maartanda-Parvatee pai nelaa ||

Ovee 65

तेथें नागवृक्ष अचिंत्य थोर । तरु नोहे तो सिद्धीचे माहेर । दृश्यादृश्य केलें पर । महातरु नांदतसे ॥ ६५ ॥

Transliteration

Tethe naaga vriksha achintya thoru | Taru nohe toh siddhee che maaheru | Drishya adrishya kele paru | Mahaataru naandatase ||

Ovee 66

तेथें करोनि बीजी हवन । तरु केला दृश्यमान । तो कनकवर्ण देदीप्यमान । निजदृष्टीं देखिला ॥ ६६ ॥

Transliteration

Tethe karoni beejee havanu | Taru kelaa drishya maanu | Toh kanakavarna dedeepya-maanu | Nija-drishtee dekhilaa ||

Ovee 67

त्या तरुच्या शाखोपांतीं । नाना दैवतें विराजती । मग नामाभिधानें सकळ भगवती । देवतांची सांगे त्या ॥ ६७ ॥

Transliteration

Tyaa taruchyaa shaakhaa-upaantee | Naanaa daivate viraajatee | Maga naama-abhidhaane sakala bhagavatee | Devataanchee saange tyaa ||

Ovee 68

तीं दैवतें धुरंधर बावन्न वीर । मूर्तिमंत असती तरुवर । नरसी काळिका महिषासुर । म्हंमदा झोटिंग वीरभद्र ॥ ६८ ॥

Transliteration

Tee daivate dhurandhara baavanna veeru | Moortimanta asatee taruvaru | Narasee Kaalikaa Mahisha-asuru | Mhammadaa Jhotinga Veera-Bhadra ||

Ovee 69

वेताळ मारुती अयोध्याधीश । श्रीकोदंडपाणी रामेश । सूर्य नामीं तेथ द्वादश । मूर्तिमंत नांदतसे ॥ ६९ ॥

Transliteration

Vetaala Maarutee Ayodhyaa-adheeshu | Shree Kodanda-Paanee Raameshu | Soorya-naamee tetha dvaadashu | Moortimanta naandatase ||

Ovee 70

पायरी जलदेवता असती नव । कुमारी धनदा नंदा नांव । विमळा मंगळा ज्ञानप्राप्तिव । लक्ष्मी आणि विख्याता ॥ ७० ॥

Transliteration

Paayaree jala devataa asatee navu | Kumaaree Dhanadaa Nandaa naavu | Vimalaa Mangalaa jnyaana-praaptivu | Lakshmee aani vikhyaataa ||

Ovee 71

यापरी चंडा मामुंडा । रंडा कुंडा महालंडा । अप्सरा जोगिनी शंडवितंडा । तरुभागीं विराजल्या ॥ ७१ ॥

Transliteration

Yaaparee Chandaa Maamundaa | Randaa Kundaa Mahaalandaa | Apsaraa joginee shanda-Vitandaa | Taru bhaagee viraajalyaa ||

Ovee 72

काळव्याळ वीरभैरव । भस्मकेत सिद्धभैरव । रुद्र ईश्वरी गण भैरव । अष्टभैरव हे असती ॥ ७२ ॥

Transliteration

Kaalavyaala Veera Bhairavu | Bhasmaketa Siddha Bhairavu | Rudra Eeshvaree Gana Bhairavu | Ashta Bhairava hey asatee ||

Ovee 73

यापरी शस्त्रअस्त्रयामिना । दमि धूमि कुचित भामिना । सातवी ज्वाळा शुभानना । वृक्षावरी त्या असती ॥ ७३ ॥

Transliteration

Yaaparee shastra-astra-yaaminaa | Dami dhoomi kuchita bhaaminaa | Saatavee jvaalaa shubha-aananaa | Vrikshaa-varee tyaa asatee ||

Ovee 74

यापरी शंखिनी डंखिणी यक्षिणी । त्या समुच्चयें असती बारा जणी । अष्टसिद्धी महाप्रकरणी । वृक्षावरी विराजल्या ॥ ७४ ॥

Transliteration

Yaaparee shankhinee dankhinee yakshinee | Tyaa samuchchaye asatee baaraa janee | Ashta siddhee mahaa prakaranee | Vrikshaa-varee viraajalyaa ||

Ovee 75

प्राप्ति प्राकाम्या अणिमा गरिमा । ईशित्व वशित्व प्रथिमा महिमा । एवंच अष्टसिद्धी नामा । तरुवरी विराजल्या ॥ ७५ ॥

Transliteration

Praapti Praakaamyaa Animaa Garimaa | Eeshitva Vashitva Prathimaa Mahimaa | Evancha ashta siddhee naamaa | Taruvaree viraajalyaa ||

Ovee 76

अष्टसिद्धीसमवेत । बावन्न वीर सकळ दैवत । तया तरुच्या शाखा व्यक्त । करोनियां बैसले ॥ ७६ ॥

Transliteration

Ashta-siddhee-samavetu | Baavanna veera sakala daivatu | Tayaa taruchyaa shaakhaa vyaktu | Karoniyaa baisale ||

Ovee 77

ऐसे दृष्टीं पाहिले सर्वही । तीं पहाती न बोलती कांहीं । यावरी अंबिका करी काई । निवे दोनी नाथातें ॥ ७७ ॥

Transliteration

Aise drishtee paahile sarvahee | Tee pahaatee na bolatee kaanhee | Yaavaree Ambikaa karee kaaee | Nive donee naathaate ||

Ovee 78

बा रे ऋषमूकपर्वतस्थानीं । ब्रह्मगिरीच्या निकटवासनीं । अंजनपर्वत तयासी म्हणी । नदी काचित् आहे बा ॥ ७८ ॥

Transliteration

Baa re Rishamooka-parvata-sthaanee | Brahma Giree chyaa nikata-vaasanee | Anjana-parvata tayaasee mhanee | Nadee kaachitu aahe baa ||

Ovee 79

दक्षिणओघीं सरिता जात । ते कांठी महाकाळी दैवत । स्थानें असती जाण तेथ । भगवतीतें नमावें ॥ ७९ ॥

Transliteration

Dakshina-oghee saritaa jaatu | Tey kaanthee Mahaakaalee daivatu | Sthaane asatee jaana tethu | Bhagavateete namaave ||

Ovee 80

तेथोनि पुढें दक्षिणपंथीं । सरितापात्रें जावें निगुती । परी बा तेथें श्वेतकुंडें असती । तोयभरित महाराजा ॥ ८० ॥

Transliteration

Tethoni pudhe dakshina-panthee | Saritaa-paatre jaave nigutee | Paree baa tethe shveta kunde asatee | Toyabharita Mahaaraajaa ||

Ovee 81

तरी शुक्ल वेल कवळूनि हातीं । एक एक सोडावी कुंडाप्रती । ऐशीं कुंडे एकशतीं । हस्तिपदसमान आहेत ॥ ८१ ॥

Transliteration

Taree shukla vela kavaluuni haatee | Eka eka sodaavee Kundaa-pratee | Aishee kunde ekashatee | Hasti-pada-samaana aaheta ||

Ovee 82

परी तितुकें पूजन कोरडे वेलीं । सकळ सरल्या परत पाउलीं । पाहात यावें ती वल्ली । सकळ कुंडामाझारी ॥ ८२ ॥

Transliteration

Paree tituke poojana korade velee | Sakala saralyaa parata paaulee | Paahaata yaave tee vallee | Sakala Kundaa-maajhaaree ||

Ovee 83

जया कुंडांत सजीव वेल । दृष्टिगोचर बा होईल । तया कुंडीं स्नान वहिले । करोनि जीवन प्राशिजे ॥ ८३ ॥

Transliteration

Jayaa kundaanta sajeeva velu | Drishti-gochara baa hoeelu | Tayaa kundee snaana vahile | Karoni jeevana praashije ||

Ovee 84

तें जीवन प्राशितां निश्चित । मूर्च्छा येईल एक मुहूर्त । तै बारा नामीं जपावे आदित्य । मूर्च्छेमाजी असतां पै ॥ ८४ ॥

Transliteration

Tey jeevana praashitaa nishchitu | Moorchchaa yeeela eka muhoortu | Tai baaraa naamee japaave Aadityu | Moorchche-maajee asataa pai ||

Ovee 85

मग प्रत्यक्ष होईल तमांतक । मौळी घ्यावा तो हस्तक । पुढें काचकूपिका भरोनि उदक । येथें यावें महाराजा ॥ ८५ ॥

Transliteration

Maga pratyaksha hoeela Tamaantaku | Maulee ghyaavaa toh hastaku | Pudhe kaacha-koopikaa bharoni udaku | Yethe yaave Mahaaraajaa ||

Ovee 86

मग बारा नामीं करोनि सिंचनीं । तरु न्हाणावा तया जीवनीं । तेव्हां दैवतें प्रसन्न होऊनि । वरदान तूंतें देतील बा ॥ ८६ ॥

Transliteration

Maga baaraa naamee karoni sinchanee | Taru nhaanaavaa tayaa jeevanee | Tevhaa daivate prasanna houuni | Varadaana toonte deteela baa ||

Ovee 87

परी एक वेळां न घडे ऐसें । खेपा घालाव्या षण्मास । एक एक दैवत एक खेपेस । प्रसन्न होईल महाराजा ॥ ८७ ॥

Transliteration

Paree eka velaa na ghade aise | Khepaa ghaalaavyaa shanmaasu | Eka eka daivata eka khepesu | Prasanna hoeela Mahaaraajaa ||

Ovee 88

ऐसें सांगोनि माय भगवती । गेली आपुले स्थानाप्रती । येरु पावला अंजनपर्वतीं । सरितापात्री ओघांतें ॥ ८८ ॥

Transliteration

Aise saangoni Maaya Bhagavatee | Gelee aapule sthaanaa pratee | Yeru paavalaa Anjana-Parvatee | Saritaa paatree oghaante ||

Ovee 89

काळी महाकाळी देवतांस । नमोनि निघाला काननास । करीं कवळोनि शुक्लवेलास । कुंडालागी शोधीतसे ॥ ८९ ॥

Transliteration

Kaalee Mahaakaalee devataansu | Namoni nighaalaa kaananaasu | Karee kavaloni shukla-velaasu | Kundaa-laagee shodheetase ||

Ovee 90

असो एकशत कुंडें पाहोन । तितुक्यांत शुक्लवेल स्थापोन । पुन्हां पाहें परतोन । सकळ कुंडामाझारी ॥ ९० ॥

Transliteration

Aso ekashata kunde paahonu | Titukyaanta shuklavela sthaaponu | Punhaa paahe paratonu | Sakala Kundaa-maajhaaree ||

Ovee 91

तों आदित्यनामें कुंडीं तीव्र । ते वेल पाहे साचोकार । तों दृष्टीं पडले पल्लवाकार । स्नान तेथें सारिलें ॥ ९१ ॥

Transliteration

Toh Aaditya naame kundee teevru | Toh vela paahe saachokaaru | Toh drishtee padale pallavaa-kaaru | Snaana tethe saarile ||

Ovee 92

स्नान झालिया उदकपान । होतांचि व्यापिलें अतिमूर्च्छेन । परी द्वादश नामीं मंत्रसाधन । सोडिलें नाहीं तयाने ॥ ९२ ॥

Transliteration

Snaana jhaaliyaa udakapaanu | Hotaanchi vyaapile ati-moorchchenu | Paree dvaadasha-naamee mantra-saadhanu | Sodile naahee tayaane ||

Ovee 93

परी मूर्च्छा ओढवली अतितुंबळ । शरीर झालें अतिविकळ । स्वेद नेत्रें गेला अनिळ । देह सांडोनि तयाचा ॥ ९३ ॥

Transliteration

Paree moorchchaa odhavalee atitumbalu | Shareera jhaale ativikalu | Sveda netre gelaa Anilu | Deha saandoni tayaachaa ||

Ovee 94

ब्रह्मांडांतोनि अंतर्ज्योती । तीही वेंधों पाहे अंती । तरी आदित्यनांवे जाण होतीं । जपालागीं नित्य करीत ॥ ९४ ॥

Transliteration

Brahmaandaa-antoni antarjyotee | Teehee vendho paahe antee | Taree Aaditya-naave jaana hotee | Japaalaagee nitya kareeta ||

Ovee 95

असें जागृती घडोनि येत । तोंचि स्वप्नीं जीव घोकीत । त्याची न्यायें उरला हेत । जीव जपी अर्का तो ॥ ९५ ॥

Transliteration

Jase jaagritee ghadoni yetu | Tenchee (Tonchi) svapnee jeeva ghokeetu | Tyaachee nyaaye uralaa hetu | Jeeva japee Arkaa toh ||

Ovee 96

ऐसें संकट घडतां थोर । खालीं उतरला प्रभाकर । कृपें स्पर्शोनि नयनीं कर । सावध केला महाराज ॥ ९६ ॥

Transliteration

Aise sankata ghadataa thoru | Khaalee utaralaa Prabhaakaru | Kripe sparshoni nayanee karu | Saavadha kelaa Mahaaraaju ||

Ovee 97

मग कामनेचा पुरवोनि हेत । मस्तकीं ठेविला वरदहस्त । म्हणे बा रे योजिला अर्थ । सिद्धी पावसी येणे तूं ॥ ९७ ॥

Transliteration

Maga kaamanechaa puravoni hetu | Mastakee thevilaa varadahastu | Mhane baa re yojilaa arthu | Siddhee paavasee yene too ||

Ovee 98

ऐसें बोलोनि आदित्य गेला । तेणें काचकुपिका भरोनि वहिला । पुन्हा मार्तंडपर्वती आला । येऊनि नमी अश्वत्थ ॥ ९८ ॥

Transliteration

Aise boloni Aaditya gelaa | Tene kaacha-kupikaa bharoni vahilaa | Punhaa Maartanda-Parvatee aalaa | Yeuuni namee Ashvatthu ||

Ovee 99

आदित्यनामें करोनि चिंतन । आदित्य तेथें झाला प्रसन्न । म्हणे महाराजा काय कामना । निवेदावी मज आतां ॥ ९९ ॥

Transliteration

Aaditya naame karoni chintanu | Aaditya tethe jhaalaa prasannu | Mhane Mahaaraajaa kaaya kaamanaa | Nivedaavee maja aataa ||

Ovee 100

येरु म्हणे कवित्व करीन । तया साह्य तुवां होऊन । मंत्रविद्या तव नामानें । फळास येवो महाराजा ॥ १०० ॥

Transliteration

Yeru mhane kavitva kareenu | Tayaa saahya tuvaa houunu | Mantra vidyaa tava naamaane | Phalaasa yevo Mahaaraajaa ||

Ovee 101

अवश्य म्हणूनि तमभंजन । मंत्रविद्या साध्य करुन । बांधला गेला जलजलोचन । मंत्रशक्तिकार्यार्थ ॥ १०१ ॥

Transliteration

Avashya mhanuuni Tamabhanjanu | Mantra vidyaa saadhya karunu | Baandhalaa gelaa Jalajalochanu | Mantra shakti kaarya artha ||

Ovee 102

ऐसा सप्त मास येरझारा करुन । दैवतांसी करोनि घेतलें प्रसन्न । मग शाबरीविद्येचा ग्रंथ निर्मून । बंगाल देशीं चालता झाला ॥ १०२ ॥

Transliteration

Aisaa sapta maasa yerajhaaraa karunu | Daivataansee karoni ghetale prasannu | Maga Shaabaree-Vidyechaa grantha nirmuunu | Bangaala-Deshee chaalataa jhaalaa ||

Ovee 103

असो ऐसी गोरक्षकथा । वदला आहे किमयागारग्रंथा । तेथें किमयांचीं स्थानें सर्वथा । सांगितली आहेत जी ॥ १०३ ॥

Transliteration

Aso aisee Goraksha Kathaa | Vadalaa aahe kimayaagaara-Granthaa | Tethe kimayaanchee sthaane sarvathaa | Saangitalee aaheta jee ||

Ovee 104

परी प्रथम अवघड करणें । तें मानवातें न ये घडोन । ते अवतारी असती परिपूर्ण । म्हणोनि घडलें तयांसी ॥ १०४ ॥

Transliteration

Paree prathama avaghada karane | Tey maana vaate na ye ghadonu | Tey avataaree asatee paripoornu | Mhanoni ghadale tayaansee ||

Ovee 105

परी सांगावया कारण । स्वमुखें गोरक्ष वदला आहे कथन । त्या ग्रंथाचा आश्रय पाहून । नवही योगी वर्णिले ग्रंथीं ॥ १०५ ॥

Transliteration

Paree saangaavayaa kaaranu | Svamukhe Goraksha vadalaa aahe kathanu | Tyaa grantha achaa aashraya paahuunu | Navahee yogee varnile granthee ||

Ovee 106

तरी श्रोतीं तया ग्रंथा । दोष न ठेवावा सर्वथा । संशय आलिया किमयागारग्रंथा । विलोकावें विचक्षणीं ॥ १०६ ॥

Transliteration

Taree shrotee tayaa granthaa | Dosha na thevaavaa sarvathaa | Sanshaya aaliyaa kimayaagaara-Granthaa | Vilokaave vichakshanee ||

Ovee 107

मुळावेगळें कांहीं कथन । येत नाहीं जी घडोन । म्हणोनि सकळ संशय सांडोन । ग्रंथ श्रवणीं स्वीकारा ॥ १०७ ॥

Transliteration

Mulaavegale kaanhee kathanu | Yeta naahee jee ghadonu | Mhanoni sakala sanshaya saandonu | Grantha shravanee sveekaaraa ||

Ovee 108

यापरी बळचि चाळवोनि दोष । निंदोनिं जो कां मोडील हरुष । विकल्पपंथी मिरवितां जगास । पावेल वंशबुडी तो ॥ १०८ ॥

Transliteration

Yaaparee balachi chaalavoni doshu | Nindoni jo kaa modeela harushu | Vikalpa-panthee miravitaa jagaasu | Paavela vanshabudee toh ||

Ovee 109

आणिक वाणी जाईल झडोन । नरकीं पडेल सप्त जन्म । आणि जन्मोजन्मीं शरीरेंकरोन । क्षयरोग भोगील तो ॥ १०९ ॥

Transliteration

Aanika vaanee jaaeela jhadonu | Narakee padela sapta janmu | Aani janmojanmee shareeren-karonu | Kshayaroga bhogeela toh ||

Ovee 110

असो तीर्थ उद्देशीं । मच्छिंद्र गेला बंगालदेशीं । तेथे फिरत तीर्थवासीं । हेळा समुद्रीं पातला ॥ ११० ॥

Transliteration

Aso aatha teertha uddeshee | Machchindra gelaa Bangaala-Deshee | Tethe phirata teertha-vaasee | Helaa Samudree paatalaa ||

Ovee 111

असो ऐसी गोष्टी । कवण कामना तुझ्या पोटीं । उदेली जे तपोजेठी । शब्दसंपुटीं मिरवीं कां ॥ १११ ॥

Transliteration

Taye deshee Chandragiri graamu | Tethe Narasimhaachaa jhaalaa janmu | Suraaja pitaa viprottamu | Kritidevee kushee jhaalaa toh ||

Ovee 112

तया गांवीं गौडब्राह्मण । सर्वोपदयाळ तया नाम । वसिष्ठगोत्री आचारनेम । सकळ धर्म पाळी तो ॥ ११२ ॥

Transliteration

Aso tethe jaauuni Naathu | Sahaja bhikshesee hindataa gaavaatu | Toh tethe bhavishya uttarakathentu | Kaaya vartale tey aikaa ||

Ovee 113

आधीं तपन यजन याजन । स्नानसंध्यामाजी निपुण । तयाची कांता गुणोत्तम । सरस्वती नामें मिरवतसे ॥ ११३ ॥

Transliteration

Tayaa gaavee Gauda-braahmanu | Sarvopadayaala tayaa naamu | Vasishtha-gotree aachaara-nemu | Sakala dharma paalee toh ||

Ovee 114

सदा सुशील लावण्यखाणी । कीं नक्षत्रपातीं विराजे मांडणी । वाटे काम इच्छा धरुनि मनीं । तेथें येऊनि बैसला ॥ ११४ ॥

Transliteration

Aadhee tapana yajana yaajanu | Snaana-sandhyaa-maajee nipunu | Tayaachee kaantaa gunottamu | Sarasvatee naame miravatase ||

Ovee 115

कीं स्वर्गी मेघांचे मंडळ पाहीं । तेथोनि चपळा उदया ये ही । कीं अर्क होऊनि गृहीं गोसावी । तेजभिक्षा मागतसे ॥ ११५ ॥

Transliteration

Sadaa susheela laavanya khaanee | Kee nakshatra-paatee viraaje maandanee | Vaate kaama ichchaa dharuni manee | Tethe yeuuni baisalaa ||

Ovee 116

जियेचे अधरपंवळदेठीं । द्विज विराजती वरती थाटीं । जैसे रत्न हेमी शेवटी । स्वतेजें तगटीं मिरवितसे ॥ ११६ ॥

Transliteration

Kee svargee meghaanche mandala paahee | Tethoni chapalaa udayaa ye hee | Kee Arka houuni grihee gosaavee | Teja bhikshaa maagatase ||

Ovee 117

भाळ विशाळ सोगयांजन । कुंकुमरसें शोभलें गहन । मुक्तानक्षत्रवरीं संगोन । चंद्राबिजोरा विराजवी ॥ ११७ ॥

Transliteration

Jiyeche adhara-pavaladethee | Dvija viraajatee varatee thaatee | Jaise ratna hemee shevatee | Sva-teje tagatee miravitase ||

Ovee 118

नासिक सरळाकृती । ते शुक्तिकारत्नहेमगुप्ती । मुक्तनळे जैसे गभस्ती । नासिकपात्रीं विराजले ॥ ११८ ॥

Transliteration

Bhaala vishaala sogayaa-anjanu | Kunkumarase shobhale gahanu | Muktaa nakshatra kabaree (kambaree) sanginu | Chandraa-bijoraa viraajavee ||

Ovee 119

कर्णबिंदीं वलयाकृती । हेममुगुटीं ढाळ देती । रत्नताटंके नक्षत्रपातीं । करुं वश्य ती पातले ॥ ११९ ॥

Transliteration

Naasika saralaa-aakritee | Tey shuktikaa-ratna-hema-guptee | Muktanale jaise gabhastee | Naasika-paatree viraajale ||

Ovee 120

असो ऐसी श्रृंगारखाणी । सकळ संपत्ति नटली कामिनी । रुपवंती सकळ गुणीं । जगामाजीं मिरवतसे ॥ १२० ॥

Transliteration

Karnabindee valayaa-aakritee | Hema-mugutee dhaala detee | Ratna-taatanke nakshatra-paatee | Karu vashya tee paatale ||

Ovee 121

परी उदरीं नाहीं संतान परम । तेणें उचंबळोनी योगकाम । न आवडे धंदा धामाश्रम । सदा वियोग बाळाचा ॥ १२१ ॥

Transliteration

Aso aisee shrringaara khaanee | Sakala sampatti natalee kaaminee | Rupavantee sakala gunee | Jagaa-maajee miravatase ||

Ovee 122

देवदेव्हारे उपाय अनेक । करिती झाली कामनादिक । परी अर्थ कोठें उदयदायक । स्वप्नामाजीं आतळेना ॥ १२२ ॥

Transliteration

Paree udaree naahee santaana paramu | Tene uchambalonee yogakaamu | Na aavade dhandaa dhaamaa shramu | Sadaa viyoga baala achaa ||

Ovee 123

नावडे आसन वसन गात्र । विकळ मिरविती निराशगात्र । शून्यधामीं चित्त । पवित्र नांदणुकी नांदतसे ॥ १२३ ॥

Transliteration

Deva-devhaare upaaya aneku | Karitee jhaalee kaamanaa-aadiku | Paree artha kothe udaya-daayaku | Svapnaa-maajee aatalenaa ||

Ovee 124

प्रपंच मानिती अतिहीन । जैसे दीपाविण शून्य सदन । कीं सकळ स्वरुपीं दाराहरण । परी नासिकहीन मिरवतसे ॥ १२४ ॥

Transliteration

Naavade aasana vasana gaatru | Vikala miravitee niraasha-gaatru | Shuunya-dhaamee chittu | Pavitra naandanukee naandatase ||

Ovee 125

कीं वज्राउपरी गिरे गोमट । परी वसतीस दिसे तळपट । तेथें पाहतां दानवी पिष्ट । कांडिती ऐसें वाटे कीं ॥ १२५ ॥

Transliteration

Prapancha maanitee atiheenu | Jaise deepaavina shuunya sadanu | Kee sakala svarupee daaraa-haranu | Paree naasika-heena miravatase ||

Ovee 126

कीं तरुविण अरण्य कर्कश । कीं सरिताविण जैसें विरस । मग तें क्षणैक पशुमात्रास । भयंकर दरी वाटतसे ॥ १२६ ॥

Transliteration

Kee Vajraa uparee gire gomatu | Paree vasateesa dise talapatu | Tethe paahataa daanavee pishtu | Kaanditee aise vaate kee ||

Ovee 127

कीं शरीरीं चांगुलपण । परिधानिलें वस्त्रानें भूषण । परी चतु:स्कंधीं शवदर्शन । सुगम कांहीं वाटेना ॥ १२७ ॥

Transliteration

Kee taruvina aranya karkashu | Kee saritaavina jaise virasu | Maga teykshanaika pashu-maatraasu | Bhayankara daree vaatatase ||

Ovee 128

तें शरीर घ्राणाविण । आप्तवर्गातें वाटे हीन । तेवीं सर्व उपचार कांतेलागोन । संसार हीन वाटतसे ॥ १२८ ॥

Transliteration

Kee shareeree chaangula panu | Paridhaanile vastraane bhooshanu | Paree chatus-kandhee shava-darshanu | Sugama kaanhee vaatenaa ||

Ovee 129

ऐसें असतां भावस्थिती । गृही दर्शिली योगमूर्ती । नाथ मच्छिंद्र अंगणाप्रती । अलक्ष सवाल वदतसे ॥ १२९ ॥

Transliteration

Tey shareera ghraanaa-vinu | Aapta-vargaate vaate heenu | Tevee sarva upachaara kaante-laagonu | Samsaara heena vaatatase ||

Ovee 130

तंव ते कांतेनें पाहूनि त्यातें । चरणीं लोटली शोकभरितें । आणोनि शीघ्र वस्त्र आसनांतें । विराजविला महाराज ॥ १३० ॥

Transliteration

Aise asataa bhaava sthitee | Grihee darshilee yoga moortee | Naatha Machchindra anganaa-pratee | Alaksha savaala vadatase ||

Ovee 131

आपण बैसोनि नाथानिकट । सांगती वियोग शोक उल्हाट । हृदयीं भरोनि नेत्रपाट । क्लेशांबु मिरविले ॥ १३१ ॥

Transliteration

Tava tey kaantene paahuuni tyaate | Charanee lotalee shoka-bharite | Aanoni sheeghra vastra aasanaante | Viraajavilaa Mahaaraaja ||

Ovee 132

म्हणे महाराजा अनाथनाथा । तुम्ही सर्वगुणी विद्येसी जाणतां । तरी मम हृदयीं शोकसरिता । नाशजळा वाटतसे ॥ १३२ ॥

Transliteration

Aapana baisoni Naathaa-nikatu | Saangatee viyoga shoka ulhaatu | Hridayee bharoni netra paatu | Kleshaambu miravile ||

Ovee 133

म्हणे तरी यातें उपाव कांहीं । सांगा म्हणोनि लागतें पायीं । पुन्हां स्पर्शोनि मौळी प्रवाहीं । कवण शब्दा वाढवीतसे ॥ १३३ ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa anaatha-Naathaa | Tumhee sarva gunee vidyesee jaanataa | Taree mama hridayee shoka saritaa | Naashajalaa vaatatase ||

Ovee 134

पुढें ठेवोनि भिक्षान्न । पुन्हां कवळी मोहें चरण । आणि नेत्रां घनाची वृष्टि जीवन । पदमहीतें सिंचीतसे ॥ १३४ ॥

Transliteration

Mhane taree yaate upaava kaanhee | Saangaa mhanoni laagate paayee | Punhaa sparshoni maulee pravaahee | Kavana shabdaa vaadhaveetase ||

Ovee 135

तेणें मच्छिंद्रचित्तसरिते । मोहसराटे अपार भरुते । शब्दें तोयओघ मिरवत । होतें सुखसरितेसी ॥ १३५ ॥

Transliteration

Pudhe thevoni bhikshaannu | Punhaa kavalee mohe charanu | Aani netraa ghana achee vrishti jeevanu | Padamaheete sincheetase ||

Ovee 136

म्हणे वो साध्वी क्लेशवंत । किमर्थ कामनीं चित्त । तें मज वद कीं चित्तार्थ । सकळां मुक्ती लाहील कीं ॥ १३६ ॥

Transliteration

Tene Machchindra chitta sarite | Moha-saraate apaara bharute | Shabde toyaogha miravatu | Hote sukha-saritesee ||

Ovee 137

ऐसें शब्दवर्गउगमा । ऐकोनि बोले द्विजरामा । म्हणे महाराज योगद्रुमा । संतती नाही वंशातें ॥ १३७ ॥

Transliteration

Mhane vo saadhvee kleshavantu | Kimartha kaamanee chittu | Tey maja vada kee chitta arthu | Sakalaa muktee laaheela kee ||

Ovee 138

तेणें वियोगें खदिरांगार । झगट करितो अतितीव्र । तेणेकरोनि चित्त शरीर । दाह पाये महाराजा ॥ १३८ ॥

Transliteration

Aise shabda varga-ugamaa | Aikoni bole dvija Raamaa | Mhane Mahaaraaja yogadrumaa | Santatee naahee vamshaate ||

Ovee 139

ऐसे क्लेश चित्तशक्ती । कदा न वसे धैर्यपाठी । दुःख गोंधळी शोकपाती । नृत्य करी कवळूनी ॥ १३९ ॥

Transliteration

Tene viyoge khadira-angaaru | Jhagata karito atiteevru | Tene karoni chitta shareeru | Daaha paaye Mahaaraajaa ||

Ovee 140

तरी हा शोकवडवानळ । जाळूं पाहे धैर्यजळ । त्यांत स्वामींनी होऊनि दयाळ । शोकाग्नींतें विझवावें ॥ १४० ॥

Transliteration

Aise klesha chitta shaktee | Kadaa na vase dhairya paathee | Dukha gondhalee shokapaatee | Nritya karee kavaluunee ||

Ovee 141

ऐसी वदतां वाग्भगवती । प्रेमा उदेला नाथचित्ती । मग आदित्यनामें मंत्रविभुती । महाशक्ती निर्मीतसे ॥ १४१ ॥

Transliteration

Taree haa shoka vadavaanalu | Jaaloo paahe dhairya jalu | Tyaata svaameennee houuni dayaalu | Shoka-agneente vijhavaave ||

Ovee 142

नाथाकरीं भस्मचिमुटी । तेथें वीर्य करी राहाटी । मग तें भस्म तपोजठी । तियें हातीं वोपीतसे ॥ १४२ ॥

Transliteration

Aisee vadataa vaag-bhagavatee | Premaa udelaa Naatha chittee | Maga Aaditya naame mantra-vibhutee | Mahaa shaktee nirmeetase ||

Ovee 143

म्हणे माय वो शुभाननी । हे भस्मचिमुटी करीं कवळुनी । घेई सेवीं आपुले शयनीं । निशीमाजी जननीये ॥ १४३ ॥

Transliteration

Naathaa karee bhasma-chimutee | Tethe veerya karee raahaatee | Maga tey bhasma tapojathee | Tiye haatee vopeetase ||

Ovee 144

म्हणसील भस्म नोहे पूर्ण गभस्ती । जो हरिनारायणउदयो कीर्ति । प्रभा मिरवोनि त्रिजगतीं । मोक्षमांदुसा मिरवेल ॥ १४४ ॥

Transliteration

Mhane Maaya vo shubha-aananee | Hey bhasma-chimutee karee kavalunee | Gheee sevee aapule shayanee | Nishee-maajee jananeeye ||

Ovee 145

तरी तूं सहसा हळवटपणी । कामना न वरीं भस्मासनी । म्यांही पुढील भविष्य जाणोनि । चिद्भवानी वदविली ॥ १४५ ॥

Transliteration

Mhanateela (Mhanaseela) bhasma nohe poorna gabhastee | Jo Hari-Naaraayana-udayo keerti | Prabhaa miravoni trijagatee | Moksha-maandusaa miravela ||

Ovee 146

या भस्माची प्रतापस्थित । तव उदरीं होईल जो सुत । तयातें अनुग्रह देऊनिया स्वतः । करीन सरस ब्रह्मांडीं ॥ १४६ ॥

Transliteration

Taree too sahasaa halavata-panee | Kaamanaa na varee bhasmaa-aasanee | Myaanhee pudheela bhavishya jaanoni | Chit-Bhavaanee vadavilee ||

Ovee 147

मग तो सुत न म्हणे माय । सकळ सिद्धींचा होईल राय । जैसा खगीं नक्षत्रमय । शशिनाथ मिरवेल ॥ १४७ ॥

Transliteration

Yaa bhasma achee prataapa-sthitu | Tava udaree hoeela jo sutu | Tayaate anugraha deuuniyaa svata | Kareena sarasa Brahmaandee ||

Ovee 148

मग तो न माय ब्रह्मांडभरी । कीर्तिरश्मीचे तेजविवरी । आणि वंद्य होईल चराचरीं । मानवदानवदेवादिकां ॥ १४८ ॥

Transliteration

Maga toh suta na mhane maayu | Sakala siddheenchaa hoeela raayu | Jaisaa khagee nakshatra-mayu | Shashi Naatha miravelu ||

Ovee 149

तरी माये संशयो न धरितां । भक्षीं भस्म सांडोनि चिंता । ऐसी सांगोनि सकळ वार्ता । नाथ उठे तेथूनि ॥ १४९ ॥

Transliteration

Maga toh na Maaya Brahmaanda-bharee | Keerti-rashmeeche tejavivaree | Aani vandya hoeela charaa-charee | Maanava daanava devaadi kaa ||

Ovee 150

यावरी बोले शुभाननी । कीं महाराजा योगधामीं । तुम्ही केव्हां याल परतोनी । सुता अनुग्रह वोपावया ॥ १५० ॥

Transliteration

Taree maaye samshaya na dharitaa | Bhakshee bhasma saandoni chintaa | Aisee saangoni sakala vaartaa | Naatha uthe tethuuni ||

Ovee 151

नाथ ऐकोन बोले तीतें । म्हणे ऐक वो सद्गुणसरिते । पुन्हां येऊनि देई उपदेशातें । द्वादशवर्षाउपरांतीं ॥ १५१ ॥

Transliteration

Yaavaree bole shubha-aananee | Kee Mahaaraajaa yoga dhaamee | Tumhee kevhaa yaala paratonee | Sutaa anugraha vopaavayaa ||

Ovee 152

ऐसे वदोनि शब्द सुढाळ । निघता झाला सिद्धपाळ । तीर्थउद्देशीं नानास्थळ । महीलागीं लंघीतसे ॥ १५२ ॥

Transliteration

Naatha aikona bole teete | Mhane aika vo sad guna sarite | Punhaa yeuuni dei upadeshaate | Dvaadasha-varsha-uparaantee ||

Ovee 153

तेरीकडे भस्मचिमुटी । सदृढ बांधोनि ठेविली गांठी । हरुष न राहे पोटीं । उचंबळोनि दाटलासे ॥ १५३ ॥

Transliteration

Aise vadoni shabda sudhaalu | Nighataa jhaalaa siddha paalu | Teertha uddeshee naanaa-sthalu | Mahee-laagee langheetase ||

Ovee 154

मग ती सर्वेंचि नितंबिनी । जाऊनि बैसे शेजारसदनीं । तेथें सात पांच व्रतजवासिनि । येऊनि त्या स्थानीं बैसल्या ॥ १५४ ॥

Transliteration

Yereekade bhasma-chimutee | Sadridha baandhoni thevilee gaanthee | Harusha na raahe potee | Uchambaloni daatalaase ||

Ovee 155

ते त्या जाया शब्दरहाटीं । सहज बोलती प्रपंचगोष्टी । त्यांत ही जाया हर्ष पोटीं । कथा सांगे ती आपुली ॥ १५५ ॥

Transliteration

Maga tee savenchi nitambinee | Jaauuni baise shejaara-sadanee | Tethe saata paancha vrataja-vaasini | Yeuuni tyaa sthaanee baisalyaa ||

Ovee 156

म्हणे माय वो ऐका वचन । चित्त क्षीण झालें संततीविण । परी आज आला सर्वार्थ घडोन । तो श्रवणपुटें स्वीकारा ॥ १५६ ॥

Transliteration

Tey tyaa jaayaa shabda-rahaatee | Sahaja bolatee prapancha-goshtee | Tyaata-hee jaayaa harsha potee | Kathaa saange tee aapulee ||

Ovee 157

एक अकस्मात माझ्या सदनीं । बोवा आला कान फाडोनि । कानफाडी केवळ तरणी । मातें दिसूनि आला तो ॥ १५७ ॥

Transliteration

Mhane Maaya vo aikaa vachanu | Chitta ksheena jhaale santatee-vinu | Paree aaja aalaa sarva artha ghadonu | Toh shravana-pute sveekaaraa ||

Ovee 158

मग म्यां त्यासी स्तवोनी भक्तीं । प्रसन्न केली चित्तभगवती । मग प्रसाद वोपूनि माझे हातीं । गमन करिता झाला तो ॥ १५८ ॥

Transliteration

Ek akasmaata maajhyaa sadanee | Bovaa aalaa kaana phaadoni | Kaanaphaadee kevala taranee | Maate disuuni aalaa toh ||

Ovee 159

तरी तो प्रसाद भस्मचिमुटी । मातें दिधली पुत्रवृष्टी । परी सांगोनि गेला स्वयें होटीं । भक्षण करीं शयनांत ॥ १५९ ॥

Transliteration

Maga myaa tyaasee stavonee bhaktee | Prasanna kelee chitta bhagavatee | Maga prasaada vopuuni maajhe haatee | Gamana karitaa jhaalaa toh ||

Ovee 160

तरी माय वो सांगा नीती । तेणें वाढेल काय संतती । येरी ऐकोनि न मानिती । तेणें काय होईल गे ॥ १६० ॥

Transliteration

Taree toh prasaada bhasma-chimutee | Maate didhalee putra vrishtee | Paree saangoni gelaa svaye hotee | Bhakshana karee shayanaantu ||

Ovee 161

अगे ऐसीं सोंगें महीवरती । कितीएक ठक बहु असती । नाना कवटाळे करुनि दाविती । जग भोंदिती जननीये ॥ १६१ ॥

Transliteration

Taree Maaya vo saangaa neetee | Tene vaadhela kaaya santatee | Yeree aikoni na maanitee | Tene kaaya hoeela ge ||

Ovee 162

आणि दुसरा त्यांत आहे अर्थ । कानफाडे कवटाळे व्यक्त । नानापरींच्या विद्या बहुत । तयांपासी असती वो ॥ १६२ ॥

Transliteration

Aghe aisee songe mahee varatee | Kitee-eka thaka bahu asatee | Naanaa kavataale karuni daavitee | Jaga bhonditee jananeeye ||

Ovee 163

काय वो सांगूं शुभगात्री । कानफाडे कृत्रिम मंत्री । जाया पाहोनि शुभगात्री । करिती कुत्री मंत्रानें ॥ १६३ ॥

Transliteration

Aani dusaraa tyaata aahe arthu | Kaanaphaade kavataale vyaktu | Naanaa-pareenchyaa vidyaa bahutu | Tayaam-paasee asatee vo ||

Ovee 164

मग ते तयांते सवें घेऊनी । हिंडती वस्ती क्षेत्रमेदिनी । रात्रीमाजी कांता करोनी । सुखशयनीं भोगिती ते ॥ १६४ ॥

Transliteration

Kaaya vo saangoo shubha-gaatree | Kaanaphaade kritrima mantree | Jaayaa paahoni shubha-gaatree | Karitee kutree mantraane ||

Ovee 165

तरी दिवसां कुत्री रात्रीं जाया । करिती त्यांसी जाण माया । तूं कोणीकडूनि भ्रमांत या । पडली आहेस जननीये ॥ १६५ ॥

Transliteration

Maga tey tayaante save gheuunee | Hindatee vastee kshetra-medinee | Raatree-maajee kaantaa karonee | Sukha shayanee bhogitee tey ||

Ovee 166

परी हें आम्हांसी दिसतें वोखट । तूं शुभानन जाया अतिवरवंट । पदरीं बांधोनि घेतले कपट । यांत बरवे दिसेना ॥ १६६ ॥

Transliteration

Taree divasaa kutree raatree jaayaa | Karitee tyaansee jaana maayaa | Too konee-kaduuni bhramaanta yaa | Padalee aahesa jananeeye ||

Ovee 167

ऐसे बोल बोलतां युवती । भवव्याघ्राची झाली वस्ती । मग ती परम विटूनी चित्तीं । सदनाप्रती आलीसे ॥ १६७ ॥

Transliteration

Paree hey aamhaansee disate vokhatu | Too shubhaanana jaayaa ati vara vantu | Padaree baandhoni ghetale kapatu | Yaanta barave disenaa ||

Ovee 168

मग ती कवळोनि भस्मचिमुटीसी । येती झाली गोठ्यापासीं । तेथें गोरजकेरांसीं । मिरवलीसे उकरडा ॥ १६८ ॥

Transliteration

Aise bola bolataa yuvatee | Bhava vyaaghra achee jhaalee vastee | Maga tee parama vituunee chittee | Sadanaa pratee aaleese ||

Ovee 169

तयामाजी भस्मचिमुटी । सांडिती झाली ते गोरटी । तयामाजी हरिजेठी । संचार करी महाराज ॥ १६९ ॥

Transliteration

Maga tee kavaloni bhasma-chimuteesee | Yetee jhaalee gothyaa-paasee | Tethe goraja-keraansee | Miravaleese ukaradaa ||

Ovee 170

जो नवनारायण कीर्तिध्वज । प्रत्यक्ष विष्णु तेजःपुंज । हरि ऐसे नाम साजे । कीर्ति रत्नामाझारीं ॥ १७० ॥

Transliteration

Tayaa maajee bhasma-chimutee | Saanditee jhaalee tey goratee | Tayaa maajee Harijethee | Sanchaara karee Mahaaraaja ||

Ovee 171

असो ऐशी अद्वैतराहटी । करोनि जाती झाली गोरटी । सदनीं येऊनि प्रपंचदिठीं । सदा सर्वदा मिरवतसे ॥ १७१ ॥

Transliteration

Jo Nava Naaraayana keerti-dhvaju | Pratyaksha Vishnu tejapunju | Hari aise naama saaje | Keerti ratnaa-maajhaaree ||

Ovee 172

असो ऐशी कथाअवसर । पुढें निवेदूं ग्रंथ सादर । तरी श्रोतीं क्षीरोदकसार । पुढिलें अध्यायीं स्वीकारणें ॥ १७२ ॥

Transliteration

Aso aishee Advaita-raahatee | Karoni jaatee jhaalee goratee | Sadanee yeuuni prapancha-dithee | Sadaa sarvadaa miravatase ||

Ovee 173

भक्तिसार हा कथार्थ ग्रंथ । शुक्तिकानवरत्नमुक्त । तुम्हां श्रोत्यांचे कर्णग्रीवेंत । भूषणांते शृंगारुं हो ॥ १७३ ॥

Transliteration

Aso aishee kathaa-avasaru | Pudhe nivedoo grantha saadaru | Taree shrotee ksheera-udaka-saaru | Pudhile adhyaayee sveekaarane ||

Ovee 174

यापरी निंदक खळ दुर्जन । असो त्यांचें कांजीपान । तयांचे निंद्य वचन ऐकोन । सोडों नका क्षीरोदका ॥ १७४ ॥

Transliteration

Bhakti Saara haa katha artha granthu | Shuktikaa-nava-ratna-muktu | Tumhaa shrotyaanche Karna-greeventu | Bhooshanaante shringaaru ho ||

Ovee 175

धुंडीसुत मालूचें वचन । नरहरि वदे जग सुगम । भावार्थगुणीं गुंफोन । माळ स्वीकारी श्रोत्यांसी ॥ १७५ ॥

Transliteration

Yaaparee nindaka khala durjanu | Aso tyaanche Kaanjee-paanu | Tayaanche nindya vachana aikonu | Sodo nakaa ksheera-udakaa ||

Ovee 176

स्वस्तिश्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । द्वितीयोध्याय गोड हा ॥ १७६ ॥

Transliteration

Dhundeesuta Maalooche vachanu | Narahari vade jaga sugamu | Bhaavaartha gunee gumphonu | Maala sveekaaree shrotyaansee ||

Ovee 177

स्वस्तिश्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । द्वितीयोध्याय गोड हा ॥ १७७ ॥

Transliteration

Svasti Shreebhaktikathaa Saaru | Sammata Goraksha Kaavya kimayaa gaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Dviteeya Adhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu | Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार द्वितीयाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Dviteeya Sampurnah